सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा




# आरटीई प्रवेश प्रक्रियेसंदर्भात ‘बनावटगिरी’चा प्रकार उघडकीस

### पालकांवर होणार कारवाई?

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ मे-

आरटीई अर्थात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत आपल्या पाल्यांना शाळांमध्ये मोफत प्रवेश मिळवण्यासाठी काही पालकांनी बनावट भाडेकरार करुन शाळांच्या अंतराचा निकष पूर्ण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

प्राथमिक शिक्षण विभागाने अचानकपणे केलेल्या पडताळणीत हा गैरप्रकार उघडकीस आला असून संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करत ‘त्या’ पालकांवर कारवाई करण्यात येणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.




आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना ‘आरटीई’ अंतर्गत खासगी शाळांमध्ये मोफत प्रवेश दिला जातो. त्यासाठी पालकांचे वार्षिक उत्पन्न साडेतीन लाख रुपयांपेक्षा कमी असणे, घर व शाळा यांतील अंतर एक ते तीन किलोमीटरच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.

हा निकष पूर्ण करण्यासाठी काही पालकांनी नातेवाईक, मित्र किंवा ओळखीच्या व्यक्तींच्या पत्त्यावर बनावट भाडेकरार करुन अर्ज सादर केले. माळशिरस तालुक्यातील काही जागरुक पालकांनी शिक्षण विभागाकडे याबाबत तक्रारी दाखल केल्या होत्या.

या तक्रारीनुसार प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाने संबंधित १३ विद्यार्थ्यांच्या अर्जांची सखोल तपासणी करुन अचानक भेटी देण्यात आल्या असता काही घरे बंद अवस्थेत आढळली तर काही ठिकाणी संबंधित पालक वास्तव्यास नसल्याचे स्पष्ट झाले.

काहींनी नातेवाईकांच्या घरात राहत असल्याचे दाखवून केवळ प्रवेशासाठी कागदपत्रांची जुळवाजुळव केल्याचेही निदर्शनास आले. दरम्यान, बनावट भाडेकरार किंवा चुकीची माहिती देऊन प्रवेश घेतल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील. संबंधित पालकांवरही नियमानुसार कारवाई केली जाईल, असे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.



# प्रत्येक शासकीय यंत्रणांनी सप्टेंबरपूर्वी प्रशासकीय मान्यता घेणे अनिवार्य

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ मे-

जिल्हा नियोजन समिती मधून जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ साठी विविध शासकीय यंत्रणांना शासकीय योजना अंमलबजावणी व विकास कामांसाठी निधी मंजूर केलेल्या आहे. या निधीअंतर्गत प्रस्तावित केलेली कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी नियोजन समितीकडून सप्टेंबर २०२६ पूर्वी प्रशासकीय मान्यता घेणे अनिवार्य आहे, असे निर्देश जिल्हा नियोजन समितीचे सचिव तथा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समिती पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी पोलीस उप आयुक्त गौहर हसन, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, प्रीतम कुंटला, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. ऋत्विक जयकर, जिल्हा शिल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांच्या सर्व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

मागील वर्षी पासून शासनाने नियोजन समितीकडून माहे सप्टेंबर २०२६ पूर्वी सर्व प्रशासकीय मान्यता घेण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे, त्यामुळे प्रत्येक शासकीय यंत्रणेने शासनाच्या निर्देशाचे तंतोतंत पालन करावे. तसेच दिनांक २२ मे २०२६ रोजी पालकमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभा नियोजित असून या सभेसाठी प्रत्येक शासकीय यंत्रणेने आपल्या विभागाशी संबंधित विविध योजना, कामे तसेच अनुपालानाच्या मुद्द्यावर अभ्यास करून आले पाहिजे व व्यवस्थित माहिती सभेत दिली पाहिजे, असेही त्यांनी सुचित केले.

### दहा टक्क्यांपेक्षा अधिक निधी वापरता येणार नाही

शासकीय यंत्रणांनी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठवताना आपल्या कार्यालयाचा यूआयडी तयार करुन त्याचा नंबर त्यावर टाकूनच प्रस्ताव पाठवावेत. हा नंबर नसेल तर संबंधित विभागांना प्रशासकीय मान्यता मिळणार नाही याची नोंद घ्यावी. शासनाच्या सूचनेनुसार यंत्रणांनी त्यांना मंजूर निधीच्या दहा टक्के निधी खरेदी करण्यासाठी वापरावा, त्यापेक्षा अधिक निधी खरेदीसाठी वापरता येणार नाही याचीही काळजी घ्यावी, अशा सूचना जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी दिल्या.

# अधिक मासच्या अनुषंगाने पंढरपूर नगरपालिकेचा ॲक्शन प्लॅन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.१५ मे -

अधिक मासात येणाऱ्या भाविकांसाठी पंढरपूर नगरपरिषदेने ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. शहरातील स्वच्छतेसह मोफत पार्किंगची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

लाखो भाविक पंढरीत विठुरायाच्या दर्शनासाठी येत असतात. पंढरीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ, सुंदर पंढरपूरचा अनुभव देण्यासाठी तसेच येथील वास्तव्यात अधिकाधिक सोयी सुविधा देण्याबाबत नेटके नियोजन करण्यात आले आहे.



शहरात विविध ठिकाणी चारचाकी गाड्यांच्या पार्किंगची व्यवस्था केली आहे. चंद्रभागा वाळवंट, पासष्ठ एकर, मंदिर परिसर, नगरप्रदक्षिणा मार्गाच्या आतील लहान-मोठे गल्लीबोळ, विविध मठ, धर्मशाळा आदी ठिकाणी नियमित सफाई केली जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## वृध्द महिलेस मारहाण; सुनेसह दोघांविरुध्द गुन्हा दाखल

सोलापूर, दि.१५ मे-

एका वृध्द महिलेस मारहाण केल्याप्रकरणी सुनेसह दोघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अश्विनी सिध्देश्वर कोकरे व योगेश विलास गायकवाड (दोघेही रा.जानकर नगर,सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत सुशिला आप्पा कोकरे (वय-६५, रा.ए ४, प्रतिक्षा बंगलोज, जानकर नगर चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.१४ मे रोजी घरात असताना घरासमोर राहणारा योगेश गायकवाड हा घरात घुसुन धक्काबुक्की करत मारहाण केली. माझी सून अश्विनी कोकरे हिनेसुध्दा हातावर बुक्या मारुन जखमी केले. पोलिस हवालदार गौडनवरु हे पुढील तपास करीत आहेत.

### ▶▶ महत्वाचे...

## ग्राहक म्हणून आला; मोबाईल चोरुन नेला

सोलापूर, दि.१५ मे-

ग्राहक म्हणून दुकानात येऊन मोबाईल चोरुन नेल्याप्रकरणी एका तरुणाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अनुराग मोरे (रा.फॉरेस्ट, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

यातील फिर्यादी मंथन बसवराज चिडगुंपी (वय-२८, रा.पुर्व मंगळवार पेठ, सोलापूर) यांचे नवी पेठेत एस मोबाईल या नावाचे दुकान आहे. दि.१३ मे रोजी यातील आरोपी ग्राहक म्हणून दुकानात आला. आणि ३८ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरुन नेला, असे फिर्यादीत नमूद आहे.

## दुचाकी चोरुन नेली

सोलापूर, दि.१५ मे-



जोडभावी पेठ येथील एका मंदिराजवळ पार्क करुन ठेवलेली एम.एच.१३ डी.एफ.६०५० या क्रमांकाची होंडा शाईन ही दुचाकी चोरट्याने चोरुन नेली. याप्रकरणी प्रभुयल्लालिंग शंकरराव तोटद (वय-३८, रा.श्रीशैल नगर, भवानी पेठ, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलिस चौकीत फिर्याद दिली आहे. ही घटना दि.८ मे २०२६ रोजी घडली. हवालदार पैकेकरी हे पुढील तपास करत आहेत.

## शुक्रवार, २२ मे रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि.१५ मे-


राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज समितीचे मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि.२२ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर जिल्हा नियोजन समितीची बैठक बोलाविण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिली.

सन २०२५-२६ अंतर्गत सर्वसाधारणख अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेच्या दि.३१ मार्च २०२६ अखेरच्या खर्चास, जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ च्या कामांच्या प्रारुप आराखड्यास मान्यता देणे आदी विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे. संबंधित अधिकारी व सदस्यांनी परिपूर्ण माहितीसह स्वतः उपस्थित रहावे. प्रतिनिधी पाठवू नयेत, असेही त्यांनी सांगितले.

# मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ मे-

महाराष्ट्र राज्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.



या पुनर्निरीक्षणासाठी अर्हता दिनांक १ ऑक्टोबर २०२६ निश्चित करण्यात आला आहे.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत घरोघरी भेटी देऊन मतदारांची माहिती पडताळली जाणार आहे. नागरिकांना दावे व हरकती दाखल करता येणार आहे, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे यांनी सांगितले

**वेळापत्रक पुढीलप्रमाणे;**

दि.२० जून ते २९ जून २०२६ -प्रशिक्षण व छपाई, दि.३० जून ते २९ जुलै २०२६ घरोघरी भेटी व मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण, दि.५ ऑगस्ट २०२६ प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी, दि.४ सप्टेंबर २०२६ पर्यंत दावे व हरकती दाखल, दि.५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोंबर २०२६ नोटीस टप्पा/दावे व हरकती निकालात काढणे, दि.७ ऑक्टोंबर २०२६ अंतिम मतदार याद्यांची प्रसिध्दी.

# आमदार सुभाष देशमुख यांच्यावर नागपूरकरच्या नेत्यांचे विशेष प्रेम

### ना. फडणवीस, ना. बावनकुळे, ना. गडकरी यांनी दिली देशमुखांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ मे-

गेल्या पंधरा दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आ.सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावरुन आमदार सुभाष देशमुख यांच्यावर नागपूरकर नेत्यांचे विशेष प्रेम असल्याचे दिसून येते.

विशेष म्हणजे, हे तीनही नागपूरकर नेते राज्य आणि देशपातळीवर दिग्गज नेते म्हणून गणले जातात. भारतीय जनता पार्टीत या तीनही नेत्यांचे असलेले वजन आणि आमदार सुभाष देशमुख यांचा सर्वांप्रति असलेला प्रेम व संपर्क याकडे यानिमित्ताने लक्ष वेधले जात आहे.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे गुरुवारी सोलापूरच्या दौऱ्यावर होते. अक्कलकोट येथील कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनी आ.सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी भेट दिली. या भेटी दरम्यान ना.गडकरी यांनी आमदार सुभाष देशमुख यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांशी दिलखुलास गप्पा मारल्या.

शहरातील दोन्ही उड्डाणपूल, आसरा पुलाचा प्रश्न त्वरीत मार्गी लावण्यात यावा. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून आवश्यक सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा आमदार सुभाष देशमुख यांनी ना.नितीन गडकरी यांच्याशी चर्चा करताना व्यक्त केली.

जुना पुणे नाका ते बोरामणी नाका दरम्यानच्या उड्डाणपुलासाठी १०२० कोटी रुपये मंजूर करत असल्याचे ना.नितीन गडकरी यांनी सांगितले.

यावेळी बाजार समितीचे संचालक मनिष देशमुख, रोहन देशमुख यांच्यासह भाजपाचे नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४४२

**तुका म्हणे कापू नाकें ।**
**पुढे आणिकें शिकविती ।।**

चांगल्या अंब्याच्या ढिगाऱ्यात एखादा नासका अंबा असला म्हणजे तो एक अंबा अनेक चांगले अंबे नासवतो. इतर अंबे नासू द्यायचे नसतील तर तो नासका अंबा बाजूला काढून टाकावा लागतो. पण माणसांच्या बाबतीत असे करता येत नाही. अर्थात, समाजामध्ये, कुटूंबामध्ये एखादा वाईट व्यक्ती असेल तर त्याला समाजातून, कुटूंबातून काढता येत नाही किंवा त्याला बाहेर फेकून देता येत नाही. खरे म्हणजे असे काढून टाकणे किंवा त्याला नष्ट करणे मानविय दृष्टीकोणातून योग्यही नसते. म्हणून अशा दूर्जन व्यक्तीस समज देण्याचा, त्याच्यात परिवर्तन करण्याचा प्रयत्न करणेच योग्य असते. पण खूप प्रयत्नाअंतीही जर तो व्यवस्थित वागत नसेल, म्हणजेच आपल्यातील दुर्गून टाकायला तयार नसेल तर त्याला शिक्षा ही द्यावीच लागते. समजावूनही तो ऐकत नाही, म्हणून माघार घेणे किंवा त्याला त्याच्या इच्छेपमाणे वागू देणे योग्य नसते. कारण त्याचे असे वागणे समाजासाठी घातक असते. त्याच्या अशा वागण्याकडे पाहून कांही इतर लोकही तसेच वागू लागतात. अर्थात, वाईट वर्तनाचे अनुकरण करणाऱ्यांची संख्या वाढू लागते. म्हणून अशांना योग्य ती शिक्षा द्यायलाच हवी. जेणे करुन अशा चुकाची पुनरावृत्ती किंवा अनुकरण इतरांकडून किंवा त्याच्याकडून होणार नाही, हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे कापू नाकें । पुढे आणिकें शिकविती ।।



आजच्या अभंगातून तुकाराम महाराजांची प्रखडता आपल्या लक्षात येते. प्रसंगानुरुप घेतलेली महाराजांची कठोरता समाजाच्या भल्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. अशा कठोरपणाचा अवलंब समाजात केला गेला नाही तर चोहिकडे अराजकता माजून राक्षसी प्रवृत्ती वाढीस लागू शकते. वाईटपणा, वाईटवृत्तीच समूळ नष्ट झाली तर तिचा परिणाम इतरांवर होऊन ती वाढीस लागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. संत महात्म्ये केवळ कठोरच होते असे अजिबात नाही. मवाळपणा पाहायचा असेल तर संताकडेच पाहावा आणि कठोरपणा पहायचा असेल तर तोही संताकडेच पाहावा. संतांचा कठोरपणा हा केवळ सुपरीवर्तनासाठीचाच असतो, हे ही लक्षात असू द्यावे. अघोरी आनंदासाठी किंवा स्वार्थापोटी संतांकडे कठोरपणा नाही. कुप्रवृत्ती नष्ट होऊन समाजात खेळी-मेळीचे, आनंदाचे वातावरण रहावे, एवढ्यासाठीच संतांनी कठोर वचने केली आहेत.संतांनी कठोर वचने केली नसती तर आज संतांचे नांवही निघाले नसते, त्यांची ग्रंथसंपदाही पहायला मिळाली नसती. केवळ मवाळपणा साखरेप्रमाणे रोग निमर्ण करु शकतो, म्हणून कडूनिंबाप्रमाणे थोडा-फार कठोरपणाही असायलाच हवा. प्रयत्न करुनही जर समोरच्यात योग्य ती दुरुस्ती होत नसेल तर त्याच्या व समाजाच्या भल्यासाठी योग्य त्या शिक्षेचा निर्णय ज्यांना अधिकार आहे त्यांनी घ्यायलाच हवा. अर्थात, कायदा कोणत्याही परिस्थितीत हातात घ्यायला नको. म्हणजेच अधिकाराच्या बाहेर जाऊन कोणतीही कृती आपल्या हातून घडता कामा नये. संत वचने ही केवळ परिवर्तनासाठी, समाजाच्या भल्यासाठीच आहेत, हे ही याप्रसंगी लक्षात असू द्यावे. आपल्या हातून चुका होऊन त्या चुकाची शिक्षा भोगण्याची वेळ आपल्यावर येऊ न देण्यासाठी, चुकाच होणार नाहीत, याची दक्षता घेणे जास्त योग्य असते. जीवन हे आनंदासाठी आहे. या मानवी जीवनातील आनंद वाढावा म्हणून आपण संत वचने अंमलात आणण्याचा योग्य तो प्रयत्न करायला हवा. यामुळे आपल्याबरोबर इतरांच्याही जीवनातील आनंदलहरी वाढण्यास मदत होऊ शकेल. म्हणून आपण आपला प्रयत्न चालू ठेवू या. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. १६ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख, कृ. त्रयोदशी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- अश्विनी (२०.१५)**
**योग - आयुष्यमान (१४.२१)**
**करण - विष्टी (१८.५५)**

**राहू काल : शनिवार**
**स. ९.०० ते १०.३०**
**दिनविशेष : १९७५: सिक्कीम अधिकृतपणे भारताचे २२ वे राज्य बनले.**
**१९९६: अटल बिहारी वाजपेयी यांनी भारताचे १० वे पंतप्रधान सूत्रे हाती घेतली.**
**१९९३: पहिल्या महिला भारतीय मोहिमेने एव्हरेस्ट सर करून नवा जागतिक विक्रम केला.**



## महापालिकेच्या सावित्रीबाई फुले स्कूलमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे-**

महानगरपालिका सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूलमधील जयेश म्हेत्रे (९२ टक्के), रिया जाधव (८० टक्के) , जैद शेख (७५ टक्के) यांनी दहावी परीक्षेत उत्तीण झाल्याबद्दल यश प्राप्त केल्याने त्यांचा सत्कार सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते करण्यात आला. जयेश यांचे वडील अंबादास म्हेत्रे हे सोलापूर महानगरपालिका घंटागाडीवर बिगारी म्हणून कार्यरत आहेत.

याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक मनीष बांगर, संतोष बुलबुले, मनपा सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम शाळेच्या मुख्याध्यापिका मोहसीना मुजावर, ॲड. कसबे, पालक संघाचे अध्यक्ष मुन्नीवर शेख उपस्थित होते.

# लोकसेवेतून स्वामीसेवेचे समाधान

## श्री वटवृक्ष स्वामींचे दर्शन घेतल्यानंतर ना. गडकरी यांचे भावोद्गार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१५ मे-**

सोलापूर ते अक्कलकोट या चौपदरीकरणाच्या रस्त्याचे काम हाती घेऊन अत्यंत कमी कालावधीत पूर्ण करून स्वामी दर्शनाकरिता अक्कलकोटला येणाऱ्या भाविकांना सुखकर प्रवासाची सोय या चौपदरीकरणामुळे उपलब्ध झाल्याने व अन्य प्रस्तावित महामार्गामुळे लोकसेवेतून स्वामी सेवेचे मानसिक समाधान लाभले असल्याचे भावोद्गार केंद्रीय व रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांनी काढले.

गुरुवारी अक्कलकोटला कामानिमित्त आल्यानंतर श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी ना. गडकरी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. या प्रसंगी बोलताना ना.गडकरी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



राज्याचा सार्वजनिक बांधकाममंत्री असताना माझी आई एकदा अक्कलकोटला स्वामींच्या दर्शनाकरिता आली होती. प्रवासादरम्यान सोलापूर-अक्कलकोट - गाणगापूरचा रस्ता अत्यंत खराब असल्याने अक्कलकोटचा रस्ता चौपदरीकरण व नीटनेटका व्हावा अशी त्यांची इच्छा होती. तसा मनोदय तिने माझ्यासमोर व्यक्त केला होता, त्यामुळे सोलापूर-अक्कलकोट या चौपदरीकरण रस्त्यामुळे आईचे स्वप्नही पुर्ण झाल्याचे समाधान झाले. यापुढेही माझ्याकडून विविध माध्यमातून स्वामी सेवा घडत राहो, असेही ना. गडकरी म्हणाले.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार ज्योती वाघमारे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, प्रथमेश इंगळे, भाजप तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, नगरसेवक महेश हिंडोळे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अक्कलकोटचे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे, अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, मंदिर समितीचे मंदार महाराज पुजारी, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे आदींसह भाविक उपस्थित होते.

## मसाप शाखा दक्षिण सोलापूरला वैशिष्ट्य पूर्ण शाखेचा राज्यस्तरीय पुरस्कार

### पुण्यात २६ मे रोजी वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.१५ मे-**

राजन लाखे पुरस्कृत कै. बाबुराव लाखे स्मरणार्थ महाराष्ट्र साहित्य परिषद वैशिष्ट्यपूर्ण शाखा म्हणून सोलापूर जिल्ह्यातील मसाप दक्षिण शाखेला निवडले आहे. दि.२६ मे रोजी या पुरस्काराचे वितरण बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे होणार असल्याचे मसाप पुणेचे अध्यक्ष योगेश सोमण, स्वाती महाळंक, प्रदीप निफाडकर यांनी जाहिर केले.

कार्यक्रमाचे नेटके नियोजन, शिस्तबध्दता, विविधता आणून प्रत्येकवेळी नवनवीन संकल्पना राबवणे, जास्तीत जास्त आणि नवनवे प्रेक्षकांपर्यत कार्यक्रम पाहोचवणे, पारंपारिक पध्दती सोबतच आधुनिकतेचा समावेश करणे आदी गोष्टीचा विचार करून म.सा.प. दक्षिण सोलापूर शाखेला यंदाचा कै. बाबुराव लाखे वैशिष्ट्यपूर्ण शाखेचा पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने विविध उपक्रम आणि कार्यक्रम राबवण्यात येतात. त्याला सोलापूरकर दिलखुलासपणे प्रतिसाद देतात. त्याची दखल घेवून साहित्य परिषदेने दक्षिण सोलापूर शाखेला वैशिष्ट्यपूर्ण शाखा म्हणून पुरस्कार जाहिर केला. यामुळे आणखी नवनवीन कार्यक्रम घेण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी व्यक्त केली.

## कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग महाविद्यालय प्रथम वर्षाच्या निकालात जिल्ह्यात अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ मे -**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्या कडून घेण्यात आलेल्या बी.एस्सी नर्सिंगच्या परीक्षेत कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग पंढरपूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. महाविद्यालयाचा यावर्षीचा प्रथम वर्ष चा निकाल ८७% टक्के लागला असून हा निकाल जिल्ह्यात अव्वल आहे.

प्रथम क्रमांक अंजली पटेल (८०%), द्वितीय क्रमांक मुंढे शिवगंगा (७८.४०%) तर तृतीय क्रमांक राजनंदिनी गायकवाड (७६.८०%) यांनी मिळवला. महाविद्यालयाचे शिस्तबद्ध वातावरण, नियमित शिक्षणप्रणाली व अनुभवी व तज्ञ प्राध्यापकांच्या विशेष मार्गदर्शनामुळे हे घवघवीत यश मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. आपल्या पाल्यांचे या महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचे सार्थक झाल्याची भावना यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांनी व्यक्त केली.





बी.एस्सी नर्सिंग महाविद्यालयाचे हे दुसरेच वर्ष असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगचे प्रा. गुरुराज कुलकर्णी, कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ.एस.पी. पाटील , पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.ए.बी.कणसे, रजिस्ट्रार गणेश वाळके, वर्गशिक्षक प्रा.सोमेश निकम तसेच सर्व प्राध्यापकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## प्रा. डॉ. रामचंद्र यादव यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**सांगोला, दि.१५ मे -**



आलेगाव (ता.सांगोला) येथील प्रा.डॉ. रामचंद्र यादव यांना के.एस.आय.पब्लिकेशन, महाराष्ट्र राज्य आयोजित २९ व्या मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दिला जाणारा लोकनेते यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार जाहीर झाला आहे. कोल्हापूर येथील करवीर नगर वाचन मंदिरात रविवार दि.१७ मे रोजी संपन्न होणाऱ्या संमेलन सोहळ्यात प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. प्रा.डॉ.यादव यांनी ज्ञानेश्वरीच्या मराठी अनुवादांचा अभ्यास या विषयावर संशोधन करून १०७२ पृष्ठांचा बृहद स्वरूपाचा प्रबंध लिहिला आहे. त्यांचा आराधना हा काव्यसंग्रह यापूर्वीच प्रसिद्ध झालेला असून साहित्य संमेलनात सर्वसाक्षी या दुसऱ्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित केलेला आहे. सदर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रा.डॉ.यादव यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.




## वैरागमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

### छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठानचा उपक्रम; मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १५ मे -**

येथील छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठानच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी परिसरातील शिव-शंभू प्रेमींनी मोठी गर्दी केली होती.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. हे पूजन वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र भापकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मकरंद नाईक निंबाळकर (माजी सभापती), निरंजन भूमकर (उपनगराध्यक्ष), शाहूराजे निंबाळकर (नगरसेवक), सरकार निंबाळकर (अध्यक्ष, प्रतिष्ठान) आदी मान्यवरांसह प्रतिष्ठानचे सचिव महेंद्र नाईक-निंबाळकर, नगरसेवक दादा काळुखे, घोटकर आडके, दादा मोरे, धनंजय गरड, विश्वजीत देशमुख, खंडू सुरवसे, आप्पा मद्रे, बापू ताटे, अण्णा जिरंगे यांसह गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक आणि तरुण उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने झाला. शेवटी, छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठानचे सचिव महेंद्र नाईक निंबाळकर यांनी आभार मानले. भगवे फेटे, जयशंभूराजांच्या घोषणा आणि उत्साही वातावरणामुळे संपूर्ण वैराग परिसर शंभूमय झाला होता.

## बंद घराचे कुलूप तोडून साडेसात हजाराची रोकड चोरीस

**सोलापूर, दि. १५ मे-**

बंद घराचे कुलूप व कोयंडा तोडून चोरट्याने कपाटातील ७,५०० रुपयांची रक्कम चोरून नेल्याची घटना न्यू बुधवार पेठ येथे ५ मे रोजी उघडकीस आली. या प्रकरणी विशाल तुकाराम गायकवाड (रा. न्यु बुधवार पेठ) यांनी फिर्याद दिली असून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. हवालदार जाधव हे गुन्ह्याचा तपास करत आहेत.

## आमदार अभिजीत पाटील यांच्या मागणीला यश

**पंढरपूर,दि.१५ मे-**

माढा मतदारसंघातील अतिशय महत्त्वाचा टेंभुर्णी ते पंढरपूर चार पदरी महामार्ग ४८ किलोमीटर लांबीचा रस्ता मंजूर झाल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी फलटणमधील पत्रकार परिषदेत केल्याबद्दल आमदार अभिजीत पाटील यांनी आभार मानले. आमदार अभिजीत पाटील यांनी मंत्री गडकरी यांच्यासोबत फलटण ते पंढरपूर प्रवास केला. प्रवासात अनेक गोष्टींवर सकारात्मक चर्चा केल्याचे सांगितले. त्याला नामदार गडकरी यांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल माढा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी आभार मानले.

## पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील रस्ते विकासासाठी निधी द्या

### आमदार आवताडे यांची केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ मे -**

पंढरपूर व मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्ग व राज्य मार्गाच्या चौपदरीकरण व बाह्यवळण रस्त्याच्या विकास कामांसाठी हजारो कोटी निधीची मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केंद्रीय रस्ते, वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे गुरुवारी केली.




पंढरपूर तीर्थक्षेत्र असून महाराष्ट्रासह देशभरातील भाविक श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने पंढरपूर येथे येतात. पंढरपूरकडे येणारी राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग व्यापक रूंद नाहीत. त्यामुळे वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली असून दुर्घटना वाढल्या आहेत. अरुंद रस्त्यामुळे भाविकांची गैरसोय होते. पंढरपूर तीर्थक्षेत्र विषयी धोरणात्मक दृष्टिकोन ठेवून वाहतूकीचा सकारात्मक विकास करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय महामार्ग एन एच ५६१ ए टेंभूर्णीपासून पंढरपूर - मंगळवेढा - उमदी महामार्गाचे चौपदरीकरण आवश्यक आहे. आषाढी,कार्तिकी व अन्य एकादशी निमित्त येणाऱ्या वारकरी संप्रदायातील दिंडी, पालखी यांच्या सोयीसाठी त्याचा फायदा होईल. तसेच पंढरपूर शहरालगत बाह्यवळण रस्त्याची आवश्यकता या दोन्ही कामांसाठी निधी मंजूर करावा, असे निवेदनात म्हटले आहे.

मंगळवेढा नगरपरिषद परिघस्त सोलापूर जिल्हा प्रादेशिक योजना ००५ साली मंजूर आहे. त्याअंतर्गत मंगळवेढा शहरास ३० मीटर रुंदीचा बाह्यवळण रस्ता प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने मंगळवेढा - पंढरपूर रस्त्यापासून पश्चिम दिशेस जुना घरनिंकी रस्त्यावरून मंगळवेढा - रत्नागिरी रस्त्यापर्यंत चौपदरीकरणासाठी निधी मंजूर करावा. महात्मा बसवेश्वर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याची कार्यवाही महाराष्ट्र शासन याच बाह्यवळण रस्त्यालगत करत असल्याने तात्काळ निधी मंजूर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे टेंभूर्णीपासून पंढरपूर-मंगळवेढा - उमदी चौपदरीकरण रस्ता मरवडे गावाच्या बाह्यवळणाने विकसित करावा, अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे.

## सोलापुरच्या क्रीडा निधीवर राजकीय शिफारशीचे ग्रहण

### पात्र शाळांना डावलून वशिलेबाजीचा खेळ!

क्रीडांगण विकास आणि व्यायामशाळांच्या सक्षमीकरणासाठी मिळणाऱ्या शासकीय अनुदानात सध्या पारदर्शकतेचा अभाव दिसत असून, नियमांपेक्षा राजकीय शिफारसींनाच अधिक महत्त्व दिले जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. शासन निर्णयानुसार क्रीडांगण विकासासाठी सात लाख, व्यायामशाळा बांधकामासाठी चौदा लाख आणि साहित्यासाठी सात लाख रुपयांचा निधी जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत दिला जातो.



या निधीचा मुख्य उद्देश शाळा आणि संस्थांमध्ये दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करणे हा आहे. मात्र, २०२५-२६ या वर्षात प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या छाननीमध्ये प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या मूळ तत्त्वाला हरताळ फासण्यात आल्याचे समोर आले आहे. यंदा क्रीडांगण विकासासाठी ११० आणि व्यायामशाळा विकासासाठी २०१ अशा मोठ्या प्रमाणात प्रस्तावांची नोंद झाली होती. त्यापैकी केवळ ३७ क्रीडांगणे आणि ५१ व्यायामशाळांना मिळून सुमारे सात कोटींहून अधिक रुपयांचे अनुदान मंजूर झाले. नियमानुसार, जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी प्रस्तावांची तपासणी करून विभागीय उपसंचालकांकडून तांत्रिक मान्यता मिळवणे आणि त्यानंतर प्रस्तावांच्या क्रमानुसार (Seniority) यादी तयार करून जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक आहे. परंतु, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी ही कायदेशीर क्रमवारी डावलून केवळ आमदारांचे शिफारस पत्र असलेल्या संस्थांच्याच प्रस्तावांची निवड केल्याची माहिती समोर येत आहे.

विशेष म्हणजे, शासन निर्णयात आमदारांच्या शिफारस पत्राची कोणतीही अट नसताना, प्रशासकीय पातळीवर हा नवीनच निकष लावल्याने खळबळ माजली आहे. या सर्व प्रकारामुळे ज्या शाळा आणि संस्थांचे प्रस्ताव तांत्रिकदृष्ट्या पात्र होते आणि ज्यांनी विहित वेळेत अर्ज केले होते, त्यांच्यावर मोठा अन्याय झाला आहे. केवळ राजकीय पाठबळ नसल्याने दर्जेदार कामगिरी करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना या लाभापासून वंचित राहावे लागले आहे.




व्यायामशाळा बांधकामातून खेळाडूंना मिळणाऱ्या आधुनिक सुविधा आणि क्रीडांगण विकासांतर्गत होणारी मैदान समपातळी, पाण्याची सोय व संरक्षक भिंतीची कामे आता केवळ शिफारस असलेल्या ठिकाणीच होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

जिल्हा क्रीडा कार्यालयाने केलेल्या या भेदभावपूर्ण व्यवहारामुळे क्रीडा क्षेत्रातील संस्थाचालकांमध्ये सध्या तीव्र संतापाची लाट असून, या संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे. क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी असलेला हा निधी आता राजकीय सोयीसाठी वापरला जात असल्याने, खेळाडू आणि शिक्षण क्षेत्रातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन पात्र संस्थांना न्याय मिळणार का? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सांगोला महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**सांगोला, दि.१५ मे -**

सांगोला महाविद्यालयामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे सदस्य सुरेश फुले व प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांचे हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमा पूजन करण्यात आले. छत्रपती संभाजी महाराज हे बहुजनांसाठी कार्य करणारे राजे होते. त्यांनी सर्व जाती-धर्मांच्या लोकांना आपल्या मंत्री मंडळात घेतले होते. तसेच ते थोर साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी पश्चिम महाराष्ट्रापासून उत्तर महाराष्ट्रापर्यंत तसेच खानदेशापासून तंजावर पर्यंत राज्य स्थापन करण्यासाठी महत्वाचे योगदान दिले. आजच्या काळात छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांची गरज असून, त्यांच्या विचारांचे आचरण प्रत्येकाने करावे असे मत डॉ.सुरेश भोसले यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन डॉ.एम.डी.वेदपाठक, प्र.अधिक्षक विलास माने, शंकर माने, मारुती कोळी यांनी केले.



### त्रिमुर्ती फोटो स्टुडिओच्या कलादालनाचे माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते उद्घाटन

**पिलीव दि १५ मे-**

पिलीव येथील निवृत्त कला शिक्षक देवानंद गोंजारी यांच्या प्रेरणेतुन साकारलेले श्रेयस गोंजारी यांच्या त्रिमुर्ती फोटो स्टुडिओ या अत्याधुनिक डिजीटल कला दालनाचे उद्घाटन माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पिलीव पंचायत समिती दस्या नम्रता पुकळे, दिपक पलसांडे, लक्ष्मण कारंडे, श्रीपाद पलसांडे, देवानंद गोंजारी, माळशिरस मंडल अध्यक्ष नितीन मोहिते, सचिन सादीकले, सुभाष सासणे, माजी सरपंच अमोल मदने-पाटील, प्रकाश जाधव, अविनाश जेऊरकर, कुमार भैस, नानासाहेब मदने, संजय पाटील, प्रमोद भैस, अंकुश भैस, योगेश देशमुख, तुषार लवटे, नानासाहेब मदने, डॉ. निलेश कांबळे, सचिन भैस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



### आझाद मैदानावर शिक्षा संघर्ष समितीला गटशिक्षणाधिकारी स्वामी यांची भेट

**वळसंग १५ मे -**

समग्र शिक्षा संघर्ष समितीच्या वतीने सेवेत कायम करणेबाबत गेल्या ९ मार्चपासून आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन चालू आहे आज आंदोलनाच ६५ वा दिवस आहे. या अंतर्गत ३३७८ कर्मचारी गेल्या २० ते २५ वर्षपासून तुटपुंज्या मानधनावर काम करीत आहेत. शासनचा कोणताही लाभा या कर्मचाऱ्यांना मिळत नाही. सेवा बाजावत असताना २५७ कर्मचारी मरण पावले आहेत त्याना कोणतंही लाभ शासनलकडून मिळत नसल्याने त्याचे कुटुंब उघड्यावर आले आहे. सदर कर्मचारी यांचे जस्तीत जास्त ८ ते १० वर्ष इतकीच सेवा असल्याने मायबाप सरकारकडून कायम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सरकारी शाळेचा पट व गुणवत्ता वाढविण्यामध्ये यांचा मोठा वाटा असल्याचे बी.आर.सी चे विषय तज्ञ,गटशिक्षणाधिकारी सहाय्यक सिद्रामय्या स्वामी यांनी सांगितले लवकरात लवकर न्याय मिळावा अशी अपेक्षा व्यक्त केली गेली.

# प्रत्येक द्वादशी ही श्री भगवंत प्रकट दिनाइतकीच महत्त्वाची

## आमदार दिलीप सोपल; द्वादशी महापूजेच्या नव्या परंपरेला बार्शीत प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१५ मे-**

भक्त राजा अंबरीष यांच्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी श्री भगवंत द्वादशीच्या दिवशी बार्शीत प्रकट झाले. त्यामुळे प्रत्येक द्वादशी ही श्री भगवंत प्रकट दिनाइतकीच महत्त्वपूर्ण आहे. या धार्मिक परंपरेचे जतन व्हावे आणि द्वादशीचे महत्त्व समाजापर्यंत पोहचावे यासाठी द्वादशी महापूजेचा नवा उपक्रम सुरु केल्याचे आमदार दिलीप सोपल यांनी सांगितले.

वैशाख कृष्ण द्वादशीनिमित्त गुरुवार दि. १४ मे रोजी बार्शी येथील श्री भगवंत मंदिरात आमदार दिलीप सोपल गटाच्या वतीने महापूजा करण्यात आली. विश्वास



बारबोले दांपत्य, योगेश सोपल दांपत्य, युवराज काटे दांपत्य, गणेश जाधव दांपत्य तसेच शिंदे दांपत्य यांच्या हस्ते महापूजा झाली. यावेळी आमदार दिलीप सोपल, आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आमदार सोपल बोलत होते.

वारकरी संप्रदायात पंढरपूरच्या विठ्ठलासाठी एकादशीचे व्रत केले जाते आणि द्वादशीला श्री भगवंताचे दर्शन घेऊन उपवास सोडण्याची वारकरी परंपरा आहे. संत परंपरेतील ही श्रद्धा आणि अध्यात्मिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने द्वादशी महापूजेची सुरुवात करण्यात येत असल्याचेही आमदार सोपल म्हणाले. पंतप्रधानांनी पेट्रोल-डिझेल बचत, खाद्यतेलाचा संयमी वापर आणि अनावश्यक सोने खरेदी टाळण्याचे केलेले आवाहन लक्षात घेऊन सर्वांनी देशहितासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे. तहसीलदारांशी बोलून इंधन आणि गॅस पुरवठ्याचा आढावा घेतल्याचेही त्यांनी सांगितले. महापूजेनंतर श्री भगवंत देवस्थानच्यावतीने आमदार दिलीप सोपल तसेच महापूजेस उपस्थित सर्व दांपत्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थान समितीचे सरपंच दादासाहेब बुडूख, मुकुंद कुलकर्णी, सोमाणी, नाना सुरवसे, माजी उपनगराध्यक्ष आबाजी पवार, कृष्णराज बारबोले, प्रा.किरण देशमुख, अंबादास शिंदे, नंदकुमार काशीद, मनिष चौहान, शंकर देवकर तसेच सोपल गटाचे आजी-माजी नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

## राजेंद्र मिरगणे यांच्या पुत्राच्या विवाह-स्वागत समारंभास मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

### कॅबिनेट मंत्री, आमदार, उद्योजकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची हजेरी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१५ मे-**

महाराष्ट्र गृहनिर्माण सल्लागार समितीचे अध्यक्ष राजेंद्र मिरगणे यांचे पुत्र प्रतीक मिरगणे यांच्या विवाह स्वागत समारंभास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राहून नववधूवरांना शुभेच्छा दिल्या.

वरळी मुंबई येथील द पॅलेस हॉल या आलिशान दालनात प्रतीक मिरगणे व बीड माजलगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांच्या कन्या प्रतीक्षा यांच्या विवाहाचा स्वागत समारंभ झाला. धावपळीच्या दिनक्रमातून मुख्यमंत्री फडणवीस यांनी राजेंद्र मिरगणे यांच्यासोबत असलेले ऋणानुबंध जपत दर्शवलेली उपस्थिती लक्षवेधी ठरली.



आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी समारंभावरुन मुंबईत परतलेल्या मुख्यमंत्र्यांनी या विवाह स्वागत समारंभात उपस्थिती दर्शवली. अभियंता प्रतीक मिरगणे यांच्या परदेशातील उच्चशिक्षणाची आपुलकीने चौकशी करुन केली व आशीर्वाद दिले.

कार्यक्रमासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ,उपसभापती नीलम गोऱ्हे, आमदार उत्तम जानकर, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राजु भोळे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार विक्रांत पाटील, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, ठाकरे गटाचे प्रमुख नेते हर्षल प्रधान, राज्य शिखर बँकेचे अविनाश महागावकर, रोहयो समितीचे अध्यक्ष शहाजीराव पवार, नगरविकास खात्याचे अवर मुख्य सचिव असीम गुप्ता, सनदी अधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा, उद्योजक पृथ्वीराज कोठारी, उद्योजक राम जगदाळे, पोलीस अधिकारी शिरीष पवार, पत्रकार अतुल कुलकर्णी, निलेश खरे, विनोद राऊत, महेश म्हात्रे, डिजिटल मीडिया संपादक व पत्रकार संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष राजा माने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### दहावीच्या परीक्षेत महाराष्ट्र विद्यालयाचे घवघवीत यश

**बार्शी, दि. १५ मे -**

महाराष्ट्र विद्यालय बार्शी या विद्यालयाचा एस.एस.सी बोर्ड परीक्षेत विद्यालयातून एकूण ५२६ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ५०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

यामध्ये विशेष श्रेणीसह २०९ विद्यार्थी उत्तीर्ण, प्रथम श्रेणीमध्ये १७० विद्यार्थी उत्तीर्ण, द्वितीय श्रेणीतून १०२ विद्यार्थी उत्तीर्ण तर २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाचा एकूण निकाल ९६.३८% लागला. विद्यालयातील ५३ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी. पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, खजिनदार जे.सी. शितोळे, शाळा समिती सदस्य डॉ. मीराताई यादव, एस.बी. शेळवणे, संस्थेचे सर्व कार्यकारणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन.बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले.

**विद्यालयातील प्रथम तीन क्रमांक याप्रमाणे :** प्रथम क्रमांक- आदिती रवींद्र पाटील ९७.२०% , द्वितीय सिद्धी चंद्रकांत लोकरे ९६.६०% व तृतीय आदर्श अनंत बोधले ९६%.



## जाणीव गोशाळेसाठी जय शिवराय प्रतिष्ठानतर्फे १२ हजारांचा कर्तव्य निधी

### छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१५ मे-**

छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने कृतीतून जयंती साजरी करण्याच्या उद्दिष्टाने जाणीव गोशाळेसाठी सोहळा हजार पाचशे रुपये कर्तव्य निधी प्रमुख मार्गदर्शक किरण कोकाटे, सचिन ललवाणी, राजन ठक्कर, अजय पाटील,ॲड. गणेश हांडे, राजेश राऊत, कार्याध्यक्ष राहुल वडेकर, सचिव विनीत नागोडे, जय शिवराय प्रतिष्ठान सर्व सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये जाणीव गोशाळेचे वसंत हवलदार, दास मस्के व सर्व सदस्य यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला,

जय शिवराय प्रतिष्ठानकडून अनेक वर्षापासून महापुरुषांचा जयंती उत्सव समाज हिताच्या कृतीतून करण्याच कार्य जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने केले जाते, याचबरोबर गोरक्षणासाठी जय शिवराय प्रतिष्ठानच्या संकल्पनेतून शेतकऱ्याच्या बांधावरची भाकड गोधन कसायाकडे न जाता गोशाळेत सांभाळण्यात यावं ही संकल्पना जाणीव गोशाळेने अत्यंत कठीण परिश्रम घेऊन प्रचंड मेहनत घेऊन सातत्यात उतरवली व शेतकऱ्यांच्या बांधावरचे भाकड गोधन गोशाळेत सांभाळण्याच्या उद्दिष्टाने जाणीव गोशाळा सुरु केली आणि या माध्यमातून त्यांनी अनेक गोधन वाचवण्याचे व ते सांभाळण्याचे अत्यंत अवघड असणारे कार्य अखंडपणे सुरु आहे.

जाणीव फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून गोधन वाचवणे व ते गोधन इच्छुक व्यक्तीच्या घरी सांभाळण्यासाठी देणे हा अत्यंत प्रभावी उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाला पाठबळ देण्याच्या उद्दिष्टाने जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी जाणीव गोशाळेसाठी खारीचा वाटा म्हणून एक कर्तव्य निधी दिला जातो. याही वर्षी १२ हजार १०० रुपये कर्तव्य निधी देण्यात आला.

## ब्रिलियंट करियर इन्स्टिट्यूटमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

### ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ मे -**

ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांनी दि. १० मे रोजी पंढरपूर येथील प्रा. परिचारक यांच्या ब्रिलियंट करियर इन्स्टिट्यूट येथील विद्यार्थ्यांना अभ्यास, यश आणि करिअर विषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमास महाराष्ट्र नॉलेज सेंटर सोलापूरचे रविराज पवार तसेच महाराष्ट्र नॉलेज सेंटर पुणेचे सचिन शिंदे यांची देखील उपस्थिती लाभली.

उदय निरगुडकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या मध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेत १०० टक्के गुण मिळवून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवणारे पंढरपूरचे तीन विद्यार्थी रुद्र उत्पात, मिहिर बडवे व अथर्व वाडेकर तसेच ब्रिलियंट करियर इंस्टिट्यूटचे इयत्ता बारावीत पंढरपूर केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवणारे अक्षय घाडगे, जेईई मेन्स परीक्षेत ९९.३०% गुण मिळवून पंढरपूरात प्रथम क्रमांक मिळवणारी वैभवी कोळी व जेईई मेन्स परीक्षेत



९७.३१% गुण मिळवून क्लासमध्ये द्वितीय क्रमांक मिळवणारे ईशान बाळेकर आदींचाही गौरव केला.

उदय निरगुडकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन, सातत्य, आत्मविश्वासआणि यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेला ''गुरुमंत्र'' दिला. त्याग व स्वयंशिस्त यांच्यामुळे आयुष्यात मोठे यश मिळते हे त्यांनी सानिया नेहवाल, सचिन तेंडुलकर अशा मान्यवरांच्या उदाहरणातून अतिशय सोप्या शब्दांत सांगितले.

**प्रा.परिचारक यांच्या ब्रिलियंट करियर इन्स्टिट्यूटचे कौतुक**

या प्रसंगी उदय निरगुडकर यांनी प्रा. परिचारक यांच्याबद्दल बोलतांना एका शिक्षकाने शिक्षणाचा उद्योग न होऊ देता शिक्षण हे त्याच्या आदर्शासकट कसे चालवावे याचा आदर्श पंढरपूर येथे निर्माण केला आहे, असे गौरवोद्गार काढले. प्रा.परिचारक यांच्या ब्रिलियंट करियर इंस्टिट्यूटचे कौतुक केले.

## ‘मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान’ अंतर्गत बार्शीतील विकासकामांचे कंधार पथकाकडून परीक्षण

### तालुक्यातील २६ ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१४ मे-**

ग्रामीण विकासाच्या दिशेने बार्शी तालुका वेगाने प्रगती करत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र शासनाच्या ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ अंतर्गत तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात आलेल्या विकासकामांचे नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातून आलेल्या तज्ज्ञ समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन परीक्षण केले.

गावागावांत राबविण्यात आलेले स्वच्छता अभियान, सौरऊर्जा प्रकल्प, शैक्षणिक सुविधा, महिला बचत गटांचे उद्योग, उपजीविका विकास तसेच लोकसहभागातून साकारलेले विविध उपक्रम यांची समितीने सखोल माहिती घेतली. ग्रामपंचायतींच्या कामकाजातील पारदर्शकता, नियोजनबद्ध अंमलबजावणी आणि ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग याबाबत समितीने समाधान व्यक्त केले.

कंधारचे गटविकास अधिकारी



महेश पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीने बार्शी तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींना भेट देत विकास कामांचा आढावा घेतला. या समितीत विस्तार अधिकारी कृषी गणेश कोकणे, विस्तार अधिकारी पंचायत प्रकाश मुसळे, विस्तार अधिकारी सांख्यिकी अमित शिंदे, वरिष्ठ सहाय्यक किरण पांडागळे, ग्रामपंचायत अधिकारी मोहन अकेमवार तसेच पत्रकार मारोती चिलपिपरे यांचा समावेश होता.

उपळाई (ठोंगे) ग्रामपंचायतीमध्ये समितीचे स्वागत उपसरपंच विजय ठोंगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य जयवंत कदम, ताई भोसले, ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय दराडे, मुख्याध्यापक पांडुरंग कांबळे, अनिल काळे, डॉ. किरण कदम, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, आशासेविका, महिला बचतगट, शेतकरी गट व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाच्या ६ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार राज्यभर ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ राबविण्यात येत असून, ग्रामपंचायतींनी गावपातळीवर केलेल्या विकास कामांचे मूल्यमापन तज्ज्ञ समित्यांमार्फत करण्यात येत आहे.

या अंतर्गत शासकीय कार्यालयांचे सौरऊर्जेमध्ये रुपांतर, ग्रामपंचायत कार्यालयांचे सुशोभीकरण, डिजीटल दप्तर व्यवस्थापन, शाळांतील शैक्षणिक सुविधा, परसबाग, सार्वजनिक स्मशानभूमीतील पाणीपुरवठा, सौरदिवे, स्वच्छता मोहीम, महिला बचतगटांचे उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या, वृक्षारोपण तसेच स्थानिक तीर्थक्षेत्र विकास यासारख्या विविध उपक्रमांची समितीने पाहणी केली.

ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सादरीकरणाद्वारे गावात राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती समितीसमोर मांडली. यावेळी पंचायत विस्तार अधिकारी नवनाथ पांडव, विस्तार अधिकारी प्रदीप कुलकर्णी, ग्रामपंचायत अधिकारी दर्शन मंडलिक, दत्ता मोरे आदी उपस्थित होते.

दरम्यान, ३ मे ते १५ मे या कालावधीत बार्शी तालुक्यातील २६ ग्रामपंचायतींच्या विकास कामांचे प्रत्यक्ष मूल्यमापन करण्यात येत असून, या अभियानामुळे ग्रामीण विकासाला नवी दिशा आणि गती मिळाल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.



## धनेश आचलारे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने बोरामणीत ६५ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**वळसंग १४ मे-**

बोरामणी पंचायत समितीचे माजी सदस्य तथा शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख धनेश आचलारे यांच्या वाढदिवसानिमित्त ६५ जणांनी रक्तदान केले.

धनेश आचलारे मित्र परिवार सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय असते.दरवर्षी सामुदायिक विवाह सोहळा तसेच अन्य सामाजिक उपक्रम राबवित असते.तसेच

दरवर्षी आचलारे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा केला जातो यावर्षी सुद्धा वृक्षारोपण, रूग्णांना फळे वाटप,रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी व्यासपीठावर

या कार्यक्रमाला मल्लिकार्जुन ब्लड सेंटरचे प्रमुख अमजद पठाण , सत्यम गायकवाड, जनसंपर्क अधिकारी नंदिनी मस्के, विशाल कोलूर, टेक्निशियन मिसबा कोटी, लता श्रीमल, अभिषेक राऊत व ग्रामस्थ मित्र परिवार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सत्कारमूर्ती धनेश आचलारे म्हणाले,वाढते अपघात अन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर तसेच रखरखत्या उन्हामुळे विविध रुग्णालयात सर्वत्र रक्ताचा तुटवडा भासत आहे ही समस्या दूर करण्यासाठी सर्वत्र रक्तदानाची शिबिर आयोजित करून ही चळवळ अधिक व्यापक करणे गरजेचे आहे. प्रत्येक युवकांनी रक्तदान करून आपले सामाजिक बांधिलकी जपावेत असे आवाहन त्यांनी केले.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी सिध्देश्वर गाडे यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१५ मे -**

शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या तातडीने मार्गी लावाव्यात अशी मागणी भाजपचे सांगोला सरचिटणीस सिद्धेश्वर गाडे यांनी निवेदनाद्वारे भाजप प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे. सदर निवेदन त्यांचे विशेष कार्यसन अधिकारी संतोष साखरे



यांनी स्वीकारले. यावेळी भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रशम कोल्हे, जिल्हा संयोजक प्रशांत शिंपी, डॉ.बी.पी.रोंगे, सरचिटणीस अमोल साखरे उपस्थित होते.

या निवेदनात नव्याने रुजू होणाऱ्या शिक्षकांना पहिली तीन वर्षे अल्प वेतनावर असणारी शिक्षणसेवक ही योजना बंद करणे, २००५ पूर्वी अस्तित्वात असणारी जुनी पेन्शन योजना सर्व शिक्षकांना लागू करणे आदी मागण्या मांडण्यात आल्या आहेत.



# आयत्या विषयातून ११ कोटींच्या औषध खरेदीला ग्रीन सिग्नल

- १५ वा वित्त आयोगाचा निधी समान प्रमाणात वितरण करणे
- जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे
- जिल्हा परिषदेतील रिक्त पदे भरणे
- शाळांमध्ये शिपाई नेमणे
- प्रत्येक तालुक्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध करणे
- नेहरू वस्ती योजनेतील स्वच्छता
- पंढरपूर येथील बंद वसतिगृह पुन्हा सुरू करणे

- झेडपीच्या पहिल्याच सभेत प्रश्नांचा भडिमार
- ठोस निर्णयांपेक्षा चर्चेलाच अधिक वेळ; सदस्यांच्या मुद्द्यांनी सभागृह तापले
- शेतकरी, महिला, दिव्यांग, विद्यार्थी आणि ग्रामीण विकासाच्या विविध योजनांना मंजुरी
- पहिलीच सभा असल्याने अनेक सदस्य फोटो, सेल्फी आणि रील काढण्यात दिसून आले व्यस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे -**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या शुक्रवारी पार पडलेल्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत आषाढी वारीसाठी तब्बल ११ कोटी रुपयांच्या औषध खरेदीला मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे हा विषय मूळ अजेंड्यावर नसतानाही ऐनवेळी 'आयत्या वेळेचा विषय' म्हणून मांडला. त्यास एकमताने मान्यता देण्यात आली. यामध्ये जिल्हा परिषद सेस फंडातून १ कोटी रुपये, तर जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १० कोटी रुपये खर्च करणार आहेत.

आषाढी वारी काही दिवसांवर आली असतानाही आरोग्य विभागाकडून औषध खरेदीबाबत ठोस कार्यवाही झाली नव्हती. हा विषय मूळ अजेंड्यावर नसल्याचे समजल्यावर पदाधिकाऱ्यांनी तातडीने विषय सभेत आणून मंजुरी घेतल्याची चर्चा सभागृहात रंगली. जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सभागृहात सभा पार पडली. तीन तास चाललेल्या सभेत शिक्षण, आरोग्य, शेती, पशुसंवर्धन, डीपी-ट्रान्सफॉर्मर, शिक्षकांची कमतरता, जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढविणे आदवर चर्चा झाली; मात्र अनेक मुद्द्यांवर ठोस निर्णय न झाल्याने नाराजीचे सूर उमटले.

विरोधी पक्षनेते नसल्याने चर्चेदरम्यान अनेक विषय भरकटल्याचे चित्र दिसून आले. अखेर सभागृह नेत्या रश्मी बागल यांनी हस्तक्षेप करून चर्चा आटोपती घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर उपाध्यक्ष पवार यांनी पुढील सभेत सविस्तर चर्चा करण्याचे आणि आठ दिवस आधी लेखी माहिती देण्याचे आश्वासन दिल्यानंतर सभा संपविण्यात आली. बोरामणी गटाचे सदस्य नेताजी खंडागळे यांनी जिल्हा परिषद आवारातील जागेवर व्यापारी संकुल उभारून उत्पन्न वाढविण्याचा प्रस्ताव मांडला.

पृथ्वीराज सावंत यांनी माढा चौकात व्यावसायिक गाळे उभारण्याची सूचना केली. माढा तालुक्यातील प्रतिनिधी अतुल पवार यांनी गाळे उभारणे शक्य नसेल तर जागा भाडेतत्त्वावर देण्याची भुमिका मांडली. सुरुवातीला सांगोल्यातील देशमुख यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहण्यात आली. ज्योती वाघमारे यांच्या बिनविरोध निवडीबद्दल अभिनंदनाचा ठराव झाला. जिल्हा परिषदेला पुरस्कार मिळवून दिल्याबद्दल कुलदीप जंगम यांचाही गौरव झाला. यावेळी जिल्हा परिषदेतील रिक्त पदे भरणे, शाळांमध्ये शिपाई नेमणे, प्रत्येक तालुक्यासाठी रुग्णवाहिका, नेहरू वस्ती योजनेतील स्वच्छता, तसेच पंढरपूर येथील बंद वसतिगृह पुन्हा सुरू करण्याची मागणी आदी विषयही चर्चेत आले. दुरुस्तीअभावी आणि कमी प्रवेशसंख्येमुळे वसतिगृह बंद असल्याचे शिक्षण विभागाने सांगितले.

बोरामणी गटातील अनेक शाळांमध्ये शिक्षक नसल्याचा मुद्दा नेताजी खंडागळे यांनी उपस्थित केला. मित्रपक्ष सदस्यांनी सोबत असूनही सन्मानाची वागणूक मिळत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. नियुक्त्यांमध्ये विश्वासात घेतले नसल्याचा आरोप केला. त्यावर उपाध्यक्ष पवार यांनी कोणालाही नाराज केले जाणार नसल्याचे सांगितले. आषाढी वारी नियोजनाबाबत सभागृह नेत्या रश्मी बागल यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी जर्मन हँगर, पाणीपुरवठा, शौचालये आदी सुविधा देण्याची तयारी सुरू असल्याचे सांगितले. गजानन महाराज पालखी स्वागतासाठी ऊळे येथे सुविधा द्याव्यात, अशी मागणीही सदस्यांनी केली.

सभेला जि.प. अध्यक्ष दिपक वैद्य, शिक्षण व आरोग्य समिती सभापती चेतनसिंह केदार-सावंत, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समिती सभापती अमृता वाघे, समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहीनकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, प्रशासकीय अधिकारी स्मिता पाटील, वित्त व लेख अधिकारी मिनाक्षी वाकडे आदींसह सर्व विभागाचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. सभेचे कामकाज उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी पाहिले.






### पशुसंवर्धन विभाग सदस्यांच्या फैलावर

सोलापूर जिल्हा परिषदेच्या पहिल्याच सभेत पशुसंवर्धन विभाग सदस्यांच्या फैलावर दिसून आला. पशुसंवर्धन विभागाकडे कर्मचाऱ्यांची कमतरता, दवाखान्यात नसलेल्या सोई सुविधा, ॲम्ब्युलन्स नसल्याने सदस्यांनी अधिकारी येवले यांना चांगलेच झापले. शिवसेना सदस्य चरणराज चवरे यांनी गाड्यांची संख्या विचारली तेव्हा अधिकाऱ्यांना सांगता आले नाही, तेव्हा सभागृहात ६६ सदस्य हे नवीन आहेत जर तुम्हालाच माहिती नाही आम्हाला कसे कळणार, ही पहिली सभा ठीक आहे पण पुढील सभेला माहिती ठेवा, असा हलगर्जीपणा आम्ही पुढे खपवून घेणार नाही असा आपल्या स्टाईलने दम भरला. भाजप सदस्य पृथ्वीराज सावंत यांनी पशुसंवर्धन0च्या दवाखान्यात कर्मचारी नेमणूक करण्याची मागणी केली.

### झेडपी प्रवेशद्वारासमोरील आंदोलने थांबवा

राज्य व केंद्र शासनाच्या विविध प्रश्नांवर जिल्हा परिषदेसमोर आंदोलने केली जात असल्याने वाहतूक आणि प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण होतात. आंदोलने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात यावीत, अशी मागणी सदस्य पृथ्वीराज माने यांनी केली.

### विकासाला चालना, सामाजिक बांधिलकी जपणारे निर्णय

सभेमध्ये शेतकरी, पशुपालक, महिला, दिव्यांग बांधव, विद्यार्थी तसेच नागरिकांच्या हिताच्या योजनांवर विशेष भर दिला. पशुसंवर्धन विभागाच्या विविध उपक्रमांसह कुक्कुट विकास योजना, दिव्यांगांसाठी शेळीगट व ई-बाईक योजना, अंगणवाडी सक्षमीकरण, ग्रामीण रस्ते व पूल विकास आदी विषयांना सभागृहाने मंजुरी दिली. जिल्ह्याच्या ग्रामीण विकासाला चालना देतानाच सामाजिक बांधिलकी जपणारे निर्णय या सभेत घेतल्याने सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

**- दीपक वैद्य, अध्यक्ष जिल्हा परिषद सोलापूर**

### जिल्हा परिषदेचे उत्पन्नवाढी संदर्भात चर्चा

सोलापूर जिल्हा परिषदेची पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवारी यशवंतराव चव्हाण सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करून अनेक जनहिताचे ठराव मंजूर करण्यात आले. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढी संदर्भात चर्चा करण्यात आली.

**- इंद्रजीत पवार, उपाध्यक्ष जिल्हा परिषद सोलापूर**

### डोणगाव प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतराचा ठराव

उत्तर सोलापूर तालुक्यातील डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचा ठराव सभेत मंजूर करण्यात आला.

### झेडपी शाळांना सुट्टी, मग अंगणवाड्यांना का नाही?

उन्हाळ्यात जिल्हा परिषद शाळांना सुट्टी दिली जाते; मात्र लहान मुलांच्या अंगणवाड्या सुरू ठेवण्यात येतात. वाढत्या तापमानाचा बालकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने अंगणवाड्यांनाही महिनाभर सुट्टी द्यावी आणि त्या काळातील आहार घरपोच उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सांगोला तालुक्यातील सदस्य लवटे यांनी सभेत केली.

### पहिल्याच सभेत प्रश्नांची सरबत्ती; अधिकारी मात्र निर्धास्त

जिल्हा परिषदेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित करत प्रशासनाला धारेवर धरले; मात्र त्यावर सखोल चर्चा न झाल्याने अधिकारीच पदाधिकाऱ्यांवर भारी पडल्याची चर्चा सभागृहात रंगली.

### सर्वसाधारण सभेला वरिष्ठ अधिकारी हजर राहावेत

जिल्हास्तरीय अधिकारी सभेला स्वतः उपस्थित न राहता प्रतिनिधींना पाठवतात. त्यामुळे सदस्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याची नाराजी सदस्यांनी व्यक्त केली. महावितरणच्या प्रश्नांवर वरिष्ठ अधिकारी अनुपस्थित असल्याने नेताजी खंडागळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला.



## माळशिरसमध्ये समाधान शिबीरात लाभार्थ्यांना दाखले वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १५ मे-**

शासनाने छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियानाअंतर्गत समाधान शिबीर आयोजित करून सर्वसामान्यांना एकाच छताखाली विविध योजनेचा लाभ देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन पुणे सहकार आयुक्त संतोष भोरे यांनी केले.

माळशिरस येथील गोपाळराव देव प्रशालेत समाधान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना केले. यावेळी तहसीलदार सुरेश शेजुळ, उपनिबंधक रूपाली फडके, नगरसेविका रेश्मा टेळे, मंडळ अधिकारी विजय लोखंडे, मुख्याध्यापक धनंजय केसकर, महसूल अधिकारी रोहन कटकरे, निलेश कुंभार, शरद खांडेकर, रोहित गायकवाड, करिश्मा जाधव, अश्विनी नागटिळक, नवनाथ वळकुंदे, अशोक सिदवाडकर, तुकाराम सावंत, रामदास ठोंबरे, नाना करडे, अप्पा वीरकर, यांच्यासह लाभार्थी, नागरिक,विद्यार्थी उपस्थित होते.

लाभार्थ्यांना सुविधा देण्यासाठी आरोग्य विभाग, नगर पंचायत, आपले सरकार सेवा केंद्र, कृषी आदी विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात विद्यार्थ्यांना दाखले, दोन शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, फळबाग प्रमाणपत्र आदी दाखले वाटप करण्यात आले.

## दुपदरीकरण कामामुळे सोलापूरातून धावणाऱ्या गाड्यांच्या मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मे-**

मध्य रेल्वे पुणे विभागातील दौंड-मनमाड दुपदरीकरणासाठी अकोळनेर-अहिल्यानगर-निंबळक स्थानकांदरम्यान दि. १६, १७ आणि १८ मे रोजी 'ट्रॅफिक ब्लॉक' घेणार आहे. या ब्लॉकमुळे सोलापूर विभागातील स्थानकांवरून धावणाऱ्या गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहेत. गाड्यांचा मार्ग बदलून त्या निर्देशित मार्गांवरून वळवण्यात येतील.

गाडी क्रमांक १२६२७ के.एस.आर. बंगळुरू-नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेस, जिचा प्रवास दिनांक १६ आणि १७ मे रोजी सुरू होणार होता, ती सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड या मार्गावरून वळवण्यात येईल. गाडी क्रमांक २०६५८ हजरत निजामुद्दीन-एस.एस.एस. हुबळी एक्सप्रेस, जिचा प्रवास दि. १७ मे रोजी सुरू होत आहे, ती मनमाड-छत्रपती संभाजीनगर-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-सोलापूर या मार्गावरून वळवण्यात येईल.

## गाणगापूर रस्त्याचे होणार नुतनीकरण

- आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सर्व मागण्यांना मंजूरी
- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निर्णयाने तालुकावासीयांत आनंद

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. १५ मे-**

केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी गुरुवारी अक्कलकोट येथे आले होते. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्‌टी यांनी त्यांना गाणगापूर रस्त्याचे नुतनीकरण करण्याचे साकडे घातले. या मागणीसह आ. कल्याणशेट्टी यांच्या सर्व मागण्या नामदार गडकरी





यांच्या हस्ते विविध रस्ते विकास दुधनी रेल्वे गेट येथे उड्डान पुल बोरी नदीवरील पुल वागदरी अक्कलकोट तोळणुर रसत्याचे दुहेरीकरण , मंहोळ बसवनगर वळसंग रस्त्याचो दुपदरीकरण आदि विकास कामाचे भूमिपुजन सभारंभ प्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गाणगापूर रस्ता खराब झाल्याची व्यथा मांडली गाणगापूर रस्ता नव्या ने नुतनीकरणाची तसेच वळसंग तांदुळवाडी रस्ता हैद्राबाद महामर्गाला जोडण्यात यावा व सोलापूरमधील वाहतुक कोंडी समस्या मिटविण्यासाठी नवा रिंगरोड रस्त्याची मागणी केंद्रीम रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली. या तीनही मागण्या तात्काळ मान्यता देण्याची ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तात्काळ दिली .याबाबत तात्काळ आदेश पारित करण्याची ग्वाही दिली . यामुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा विविध विकास कामे भूमिपुजन दौरा अक्कलकोट विधान सभा मतदार संघासह सोलापुर जिल्हा वासीयांसाठी मोठा फलदायी ठरला आहे. यामुळे अक्कलकोट तालुकावासियांतून आनंद व्यक्त केला जात आहे .

आमदार कल्याणशेट्टी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अक्कलकोटसाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल आभार व्यक्त केले. आच्या मागण्या पेक्षाही जास्त भरभरून दिले. सोलापुरला जाण्यासाठी तासापेक्षा अधिक काळ लागायचा आता तुम्ही वीस मिनिटात पोहचु शकता. अक्कलकोट येणाऱ्या भाविक पर्यटकांची संख्या प्रचंड वाढली.हॉटेल, लॉज, भक्त निवास, रिसॉर्ट व्यवसाय वाढीस लागले. अनेकांना रोजगार मिळाला. सोलापूरला शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड वाढली. इंधन, वेळेची मोठी बचत झाली, अशा शब्दात आभार व्यक्त केले.

## पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होण्याचा मार्ग मोकळा

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश
- आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ मे-**

पंढरपूर आणि परिसरातील नागरिकांना वाहन नोंदणी, परवाने, फिटनेस तपासणी व इतर परिवहन विषयक कामासाठी सोलापूरला जावे लागत असल्याने नागरिकांचा वेळ व आर्थिक अडचणीशी सामना करावा लागत नागरिकांच्या सोयीसाठी पंढरपुर येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालयाची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. या मागणीची दखल घेऊन पंढरपूर- मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पंढरपूर येथे नवीन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्यात यावे. अशी आग्रही मागणी केली होती. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिवहन



विभागाला कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने संबंधित विभागांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर लवकरच पंढरपुरात नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होण्याचा मार्ग आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्या मुळे मोकळा झाला आहे.

पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिर हे दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. लाखो वारक-यांचे श्रध्दास्थान व उभ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर हे चैत्री, आषाढी, कार्तिकी, माघी यात्रेसाठी मर्यादित न रहाता या तीर्थक्षेत्रात कर्नाटक, आध्रप्रदेश, तामीळनाडू या राज्यातून व देशभरातून वर्षभरात एक कोटी पेक्षा अधिक भाविक पंढरपूर येथे दाखल होत असतात.

पंढरपूर शेजारील मंगळवेढा-सांगोला-मोहोळ-माढा तसेच पंढरपूर शेजारील कासेगांव, लक्ष्मीटाकळी, वाखरी, गोपाळपूर ही निमशहरी म्हणून गावे वसलेली आहेत.

पंढरपूर शहर व ४ निमशहरी गावांच्या लोकसंख्या २ लाखाचे आसपास असल्याने येथे वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून वाहन नोंदणी, परवाना, तपासणी व इतर परिवहन विषयक कामांसाठी नागरिकांना दूरच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात जावे लागते. नागरिकांच्या सोयीसाठी पंढरपूर येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे आमदार समाधान आवताडे यांनी करून यासाठी पाठपुरावा सुरू ठेवला होता.

त्या अनुषंगाने शासन स्तरावर हालचाली सुरू झाल्या असून शासन पत्र क्र. एमव्हीडी ०४२६/प्र.क्र.१२८/परि-४ नुसार, पंढरपूर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्यासाठी आवश्यक बाबींचा अभ्यास करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याने पंढरपूर येथे नवीन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होण्याचा मार्ग आमदार अवताडे यांच्या पाठपुराव्यामुळे मोकळा झाला आहे.